महासागर

बुधवार, दि. 19 मार्च 2025

अमरावती

पान 3

# नागपूरच्या पार्श्वभूमिवर अमरावतीमध्ये हायअलर्ट

## चौकाचौकात पोलिसांचा बंदोबस्त ■ शांतता राखण्याचे अमरावती पोलिसांकडून आवाहन






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** – नागपुरात घडलेल्या दंगलीमुळे राज्यभरात खळबळ उडाली असून, अमरावती शहरात पोलिस यंत्रणा अलर्ट झाली आहे. अमरावती पोलीसांनीही खबरदारी म्हणून चौकाचौकात बंदोबस्त वाढविला असून, पोलिसांनी शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

नागपुर शहरात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभुमीवर कोणत्याही समाजाच्या भावना दुखावणारे किंवा दोन धर्मामध्ये तेढ पसरविणारे आक्षेपार्ह मॅसेज, इमेजेस, व्हिडीओज् व माहितीची शहानिशा न करता व्हॉटसअ‍ॅप, फेसबुक, व्टिट्र, इन्स्टाग्राम व इतर सोशल मिडीया माध्यमांवर पोस्ट प्रसारीत करू नये. कोणत्याही अफवा पसरवु नये. अशा कोणत्याही पोस्टमुळे दोन व्यक्ती, समाज, धर्म, पंथ अशांच्या भावना दुखावुन समाजात तणाव निर्माण होवून कोणतीही अनुचित घटना घडल्यास सदर पोस्ट करणार्या इसमांस गुन्हा करण्यास प्रवुत्त केल्याचे समजुन त्यावर कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे शहर पोलिसांनी कळविले आहे.

### तर ग्रुप अ‍ॅडमीनवर होणार कारवाई

नागपुर शहरातील झालेल्या घटनेच्या संदर्भाने खोटे मॅसेज व अफवा सोशल मिडीयावर पसरवीण्यास तसेच दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करणार्‍या पोस्ट व्हायरल करणार्‍या व संबधीत ग्रुप अ‍ॅडमीन यांना जबाबदार धरण्यात येईल. असे कृत्य करणार्यास महाराष्ट्र पोलीस कायदा तसेच भारतीय न्याय संहीता प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. असा इशारा सर्व व्हॉटसअ‍ॅप अ‍ॅडमीन यांना देण्यात आला आहे. आपण सर्वांनी अमरावती शहरामध्ये शांतता व सामाजिक सलोखा राखण्यासाठी पोलीस दलास सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती पोलिसांनी केले आहे.

### समाजमाध्यमांवर करडी नजर

अमरावती शहरात संपुर्ण आयुक्तालयात सर्व ठिकाणी चोख बंदोबस्त नेमण्यात आलेला असून सर्व पोलीस दल सतर्क आहे. तसेच सोशल मिडीया मॉनीटरींग सेल स्थापन करण्यात आला असून सर्व व्हॉटसअ‍ॅप, फेसबुक, व्टिट्र, इन्स्टाग्राम व इतर सोशल मिडीया माध्यमांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

# तिवस्यातील एटीएम फोडणारे परप्रांतीय गजाआड

## हरियाणातून दोघांना अटक ■ स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची कारवाई





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** – स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तिवसा शहरातील एस.बी.आय. बँकेचे ए.टि.एम. फोडून पसार होणार्या दोन आरोपींना 17 मार्च रोजी हरीयाणा राज्यातुन अटक केली. आमीरखान अख्तर खान (35, रा. मोहमदपुर अहीर, ता. तावडु, जि. नुह (हरीयाणा) व जुबेर अल्लाहदीया (32, रा. रुबड मोहल्ला, धौज, ता. थौज जि. फरीदाबाद (हरीयाणा) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून 8 लाख 10 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

26 फेब्रुवारी रोजी तिवसा पोलिस ठाण्यात अल्पेश रमेशराव तांबुसकर (36, रा. रा.स्वागत नगर, नागपुर) यांनी तक्रार दिली कि, तिवसा शहरातील एस. बी. आय. बँकेच इमारतीमध्ये एस. बी. आय. बँकेचे ए.टि.एम.मशीन गॅस कटरचे साहाय्याने फोडुन चोराने ए.टी.एम. मधील नगदी 4 लाख 80 हजार रुपये चोरुन नेले. दरम्यान एटीएमला आग लागली आणि एटीएम मशिन जळून खाक झाला. या तक्रारीवरुन तिवसा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम 331 (4), 305 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केले आणि वेगवेगळे पथक तयार करुन सुचना निर्गमीत केल्या होत्या. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस करीत होते. दरम्यान पोलिसांनी बॅकेच्या एटीएममधील सि.सि.टी.व्ही. फुटेजच्या विश्लेषणावरुन तसेच मिळालेल्या गोपनीय माहीतीवरुन सदर गुन्हा हा हरीयाणा राज्यातील कुख्यात टोळीने केला असल्याचे समजले. या माहितीवरून पोलिस पथकाने 13 मार्च रोजी हरियाणातील मोहमदपुर अहीर येथे जाऊन सापळा रचला आणि या गुन्ह्यातील आरोपी आमीरखान अख्तर खान याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, प्रथम त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. परंतू पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याने सदर गुन्हा हा त्याच्या साथीदारासोबत केल्याची कबुली दिली. त्यामुळे पोलिसांनी आरोपीला अटक केली. आरोपी आमीरखान अख्तर खान याचे सांगण्यावरुन त्याने जुबेर याच्या मारुती स्विफट गाडीने साथीदारसह तिवसा येथे जावुन गुन्हा केला असल्याचे कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला हरियाणातील रुबड मोहल्ला येथे जाऊन दुसरा आरोपी नामे जुबेर अल्लाहदीयाला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, आमिर खान व जुबेर यांनी चारचाकी वापरून सदर ए.टी.एम. फोडुन रक्कम चोरी केली असल्याची माहिती पुढे आली. त्यामुळे पोलिसांनी 17 मार्च रोजी दोन्ही आरोपींना अटक केली. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यातील विना क्रमांकाची एक हुंडाई कंपनीची वरणा कार तसेच एक मोबाईल असा एकुण 8 लाख 10 हजाराचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी व मुद्देमाल तिवसा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. पुढील तपास तिवसा पोलिस करीत आहे. या गुन्ह्यातील इतर आरोपीतांचा शोध पोलिस घेत आहे. दोन्ही अटक आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांना 20 मार्चपर्यंतची पोलिस कोठडी सुनावली आहे.

### या पथकाची कामगिरी

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार, मोहमद तसलीम, मुलचंद भांबुरकर, पोलीस अंमलदार अमोल देशमुख, बळवंत दाभने, रवीद्र बावणे, गजेंद्र ठाकरे, भुषण पेठे, मंगेश लकडे, सचीन मसांगे, पंकज फाटे, दिनेश कनोजीया संजय प्रधान, सुरेश पवार, सागर धापड, चेतन गुल्हाने, शिवा सिरसाठ यांनी केली.

## दारुची अवैध विक्री करताना पकडले

**अमरावती** – भानखेडा परिसरातील पाटीलचा वाडा यांच्या हॉटेलच्या मागील परिसरात दारुची अवैध विक्री करणार्या एका इसमाला बडनेरा पोलिसांनी 16 मार्च रोजी ताब्यात घेतले. याप्रकरणात बडनेरा पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक सुरेंद्र पाटील यांच्या तक्रारीवरून आरोपी चित्रकुट मंल पाटील (55, रा. यशोदानगर) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

## औरंगजेबाचे कौतुक सहन करू शकत नाही - किरीट सोमय्या



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** – काही लोकांना औरंगजेबाला हिरो करायचे आहे. मात्र ही गोष्ट हिंदुस्थान आणि महाराष्ट्र कधीच सहनच करू शकत नाही,अशी प्रतिक्रिया भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अमरावतीत (दि.18) दिली आहे. सध्या राज्यात औरंगजेबाच्या कबरीवरून सुरू असलेल्या वादावर ते माध्यमांशी बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले कि, मात्र सरकारी मंत्री असो किंवा सरकारी यंत्रणा असो त्यांनी सुद्धा थोडं नियंत्रण ठेवलं पाहिजे. औरंगजेब हा एक नंबरचा क्रूर होता हा इतिहास आहे. औरंगजेबाचं कोणी कौतुक करत असेल तर आम्ही सहन करू शकणार नाही. पण सरकारची काही बंधनं आहेत म्हणून त्या वास्तूचे रक्षण करावे लागत आहे,असेही ते म्हणाले. संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्या मनात औरंगजेबाबद्दल सहानुभूती आहे का? असा सवालही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्येक भक्तांची, मग तो मंत्री का असे ना, त्याची इच्छा आहे की औरंगजेबाची कबर असता कामा नये. सरकारच्या काही मर्यादा असतात. ती जी काही वास्तू आहे त्याचं न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जे काही व्हायचं ते होईल, पण तो पर्यंत सरकारने त्याची काळजी घ्यावी,असेही ते म्हणाले.

# धारणी पोलिसांनी 33 गोवंशांना दिले जीवनदान

### भोकरबर्डी येथे कारवाई





**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.18 )** – धारणीपासून 14 किमी अंतरावर असलेल्या मध्यप्रदेश सीमेवर वसलेले भोकरबर्डी येथे गुप्त माहितीनुसार धारणी पोलिसांनी धाड टाकून 33 गोवंशांना पकडले.

प्राप्त माहितीनुसार धार्मिक पोलिसांना गुप्त माहिती नुसार 33 गोवंश मध्य प्रदेशातून दीड तलईवरून महाराष्ट्रात जात आहे. ही माहिती ठाणेदार अशोक जाधव यांना माहिती मिळताच त्यांनी आपल्या चमुना भोकरबरदी येथे तैनात करून कत्तली साठी क्रूरतेने नेत असलेल्या 33 गोवंशाना पकडुन त्यांना जीवनदान दिले. 33 गोवंश असून त्यांची किंमत अंदाजे सहा लक्ष पन्नास हजार इतकी आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशावरून ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, हंकारे, कासदेकर, राम सोळंके, मोहित आगाशे, कुंदन नंदवंशी, गजानन जामनेर, जीवन गोडंबे, सुजित वानखडे सुहास डहाके पोलीस अंमलदार मोहित आकाश यांच्या तक्रारीवरून पुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे 33 गोवंशांचे जीवन वाचले त्यामुळे तालुक्यातील गोरक्षकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# बकर्‍या चोरी प्रकरणातील दोघांना अटक

### पाच गुन्ह्यांची कबुली

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.18 )** – बकर्‍या चोरी प्रकरणातील दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना 17 मार्च रोजी अटक केली. मोहित रामसिंग पवार (23) व अमिन सुनिल भोसले (21, दोन्ही रा. शेंदोळा (बु), ता. तिवसा) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आले आहे. पोलिस इतर पसार आरोपींचा शोध घेत आहे.

13 मार्च रोजी विजय हिम्मततराव धर्माळे (36, यावली) यांनी माऊली जहागिर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली कि, रात्री दरम्यान त्यांच्या टिनाच्या शेडमधून चार अनोळखी इसमांनी बकर्या चोरून नेल्या. त्यावेळी त्यांनी विरोध केला असता, आरोपींना त्यांना व त्यांच्या वडिलांना मारहाण केली. या तक्रारीवरून माऊली पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविला. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलिस अधीक्षक विशाल आनंद स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारे दोन्ही आरोपींना अटक केली. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपींनी माऊली जहागिर, तळेगाव येथील दोन गुन्हे, वरुड व सरमसपुरा येतील एका गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली असून, आरोपींच्या तीन साथीदारांचा पोलिस शोध घेत आहे. आरोपींना माऊली जहागिर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## 60 हजाराचे जॅक पाईप लंपास

**अमरावती** – राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी परिसरात सुरु असणार्या शेड बांधकाम स्थळावरून चोराने 60 हजार रुपये किमंतीचे लोखंडी पाईप लंपास केले. या घटनेची तक्रार शिवराज भास्करराव रिठे यांनी 16 मार्च रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली.

# महिलेकडून पैसे चोरणार्‍याला अटक

### खोलापुरी गेट पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** – सराफा बाजार येथे खरेदी करण्याकरिता आलेल्या महिलेचे 10 हजार रुपये चोरी करणार्या एका आरोपीला खोलापुरी गेट पोलिसांनी 24 तासाचे आत अटक केली. किशोर मधुकरराव खडसे (वय 40 रा. वडाळी, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. या कारवाईमुळे खोलापुरी गेट पोलिसांची कौतुक होत आहे.

महिला सराफा बाजारात महिला खरेदीकरिता आली होती. त्यावेळी महिलेजवळील पैसे अज्ञात चोराने लंपास केले होते. या घटनेची माहिती महिलेने खोलापुरी गेट पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी गुप्त माहितीवरून आरोपी निष्पन्न करीत, त्याला चोविस तासात अटक केली. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर, पोलिस निरीक्षक गौतम पातारे व क्राईमचे पोलिस निरीक्षक होळकर यांचे मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक वैभव वंजारे, सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रवीण खैरकर, पोलिस हवालदार राम लोखंडे, देवेंद्र कोठेकर, मंगेश भेलाये, इरफान, अमोल नकाशे व चालक प्रवीण परडखे यांनी केली. पोलिसांनी अटक आरोपी किशोर मधुकरराव खडसे याच्या ताब्यातून चोरीची रक्कम जप्त केली. डी.बी.पथक यांनी महत्वाच्या शिवजयंती बंदोबस्त पार पाडून बरेच परिश्रम घेऊन हा गुन्हा उघडकीस आणला आहे. त्यामुळे खोलापुरी गेट पोलिसांची सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावर बच्चू कडू कायम

### उच्च न्यायालयाचा दिलासा






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )**– मुंबई उच्च न्यायालयाने अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांना आज मोठा दिलासा देताना त्यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेली अपात्रता याचिका फेटाळली आहे. त्यामुळे आता बच्चू कडू हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून कायम राहणार आहेत. दिव्यांगासाठी आंदोलन केल्याप्रकरणी बच्चू कडू यांना स्थानिक न्यायालयाने 2 वर्षांची शिक्षा सुनावली होती. अशा स्थितीत बच्चू कडू यांना शिक्षा झाल्याचा मुद्दा उपस्थित करत जिल्हा बँकेच्या विरोधी संचालकांनी त्यांना बँकेच्या अध्यक्षपदी राहण्यास अपात्र घोषित करण्याच्या मागणीसह या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. जिथे सुनावणीनंतर उच्च न्यायालयाने विरोधी संचालकांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आणि बच्चू कडू यांच्या विरोधात अपात्रतेचा कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, असे स्पष्ट केले. अशा परिस्थितीत उच्च न्यायालयाचा हा निर्णय बच्चू कडू यांना मोठा दिलासा मानला जात आहे. या निर्णयावर आपली प्रतिक्रिया देताना बच्चू कडू म्हणाले की, न्यायालयाच्या निर्णयाने आता सत्याचा विजय झाला असून त्यांना पदावरून हटवण्याचे विरोधकांचे मनसुबे उधळून लावले आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# हिंदुत्ववादी सरकार असूनही कत्तलीसाठी गोवंशाची तस्करी

## कॉउ स्कॉड निष्क्रिय ? ■ मध्यप्रदेशातून खुलेआम होते वाहतूक

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.18 )–** राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात असला तरी अमरावती जिल्ह्याला लागून असलेल्या मध्य प्रदेश राज्यातून अवैध मार्गाने कत्तलीसाठी गोवंशाची खुलेआम तस्करी करण्यात येत असल्याची बाब गेल्या काही दिवसांतील कारवायांमधून समोर आली आहे. गोवंश तस्करी आणि त्यांची कत्तल रोखण्यासाठी गठित करण्यात आलेले काउ स्कॉड आणि अन्य यंत्रणा हा गैरप्रकार रोखण्यात पूर्णतः अपयशी ठरत असल्याचे दिसून येते.




अमरावती ग्रामीण पोलीसांच्या अखत्यारित येणार्या पोलिस ठाण्यांच्या हद्दींमधून मध्यप्रदेशातून महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात गोवंश तस्करी करण्यात येत आहे. कत्तलीसाठी खुलेआम ही जनावरे अमरावती जिल्ह्याच्या मार्गाने राज्यात इतरत्र नेली जातात. अमरावती ग्रामीण पोलीस विभागाचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष असून पोलिसांची भूमिका शंकांना वाव देत आहे. अमरावती ग्रामीण पोलिस विभागाअंतर्गत येणार्याग काही पोलिस ठाण्यांच्या सीमा या मध्य प्रदेश राज्याला लागून आहेत. या भागातून मोठ्या प्रमाणावर गोवंशाची तस्करी सुरू असताना कारवाई केली जात नसल्याने अनेकजण पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करित आहेत. स्थानिक पोलीस ठाण्यांसोबतच स्थानिक गुन्हे शाखा देखील या प्रकरणावर जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याचीही चर्चा आहे.

### मग त्या कारवाया का थांबल्या ?

काही दिवसांपूर्वी मोर्शी व शेदुरजनाघाट पोलिसांनी गोवंश तस्करीवर बोटावर मोजण्या इतक्या थातूर मातूर कारवाई केल्या. त्यानंतर आता काही दिवसांपासून कारवाई अचानक थांबल्या. ग्रामीण पोलीस दलातील ठाणेदार हे गैरप्रकार लक्ष द्यायला तयार नाहीत, असे चित्र आहे. आता पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी गांभीर्याने लक्ष घालून याकामी पुढाकार घ्यावा अशी मागणी केली जात आहे.

### पोलिसांची मूकसंमती तर नाही ना!

ग्रामीण पोलीस विभागाने गोवंश हत्या आणि तस्करीवर कारवाई करण्यासाठी तयार केलेला काऊ स्कॉड सूत्रांच्या माहितीनुसार डिसेंबरमध्ये बंद करण्यात आला. त्यामुळे जिल्ह्यातील गोवंश तस्करीला स्थानिक पोलिसांचे मुक संमती तर नाही, अशी विचारणा होत आहे. अमरावती जिल्ह्यातील धारणी, चिखलदरा, परतवाडा, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, अकोट, शिरसगाव कसबा, ब्राह्मणवाडा थडी, मोर्शी, शेंदूरजना घाट, वरुड मार्गे मोठ्या प्रमाणावर गोवंशाची तस्करी केली जाते. मात्र ही तस्करी सुरू असताना मागील दहा ते बारा दिवसापासून एकही कारवाई न झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### पालकमंत्र्यांनी घालावे लक्ष

या सर्व गैरप्रकारांवर आता अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे लक्ष देतील का असा प्रश्न विचारला जात आहे. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात हिंदूचे सरकार असताना खुलेआम–गौवंश तस्करीवर कारवाई होत नसल्याचे हिंदू बांधव आणि गोरक्षक पोलिस विभागाप्रती रोष व्यक्त करित आहेत.



# उन्हामुळे परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करा!

## प्रहारची शिक्षण संचालकांकडे मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी ( दि.18 )–** विदर्भासह राज्यातील इतर जिल्ह्यात दिवसेंदिवस उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. उन्हाने आताच शालेय मुलांच्या अंगाची लाही लाही होऊ लागली आहे. त्यातच हवामान खात्याच्या अंदाजानुसार एप्रिल महिन्यात उन्ह आणखी वाढणार आहे. शिवाय राज्यातील विविध भागातील भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांमध्ये एकाच वेळी इयत्ता पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा आयोजित करणे अशक्य होणार आहे. त्यामुळे याबाबत जाहीर केलेल्या परीक्षांच्या वेळापत्रकाबाबत पुनर्विचार करावा आणि त्यात बदल करावा, अशी मागणी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी केली आहे. यांसदर्भात त्यांनी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांना पत्र पाठविले आहे.

राज्यातील सर्व शाळांमधील इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या सर्व वर्गांच्या वार्षिक परीक्षा, संकलित मूल्यमापन आणि प्रगतीशील मूल्यांकन चाचण्यांचे एकाच वेळी आयोजन करणेबाबतचे संकलित वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने सर्व शाळांना पाठविले आहे. राज्यातील सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे. या वेळापत्रकानुसार 8 ते 25 एप्रिल याच कालावधीत या सर्व वर्गांच्या परीक्षा घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

सध्या, राज्यातील प्रत्येक ठिकाणी भौगोलिक परिस्थिती व उन्हाची तीव्रता वेगवेगळी आहे. या बाबींचा विचार करता, वार्षिक परीक्षांचे संपूर्ण नियोजन त्या त्या शालेय व्यवस्थापनावर सोपविण्याची आवश्यकता आहे, अशी आग्रही मागणी ठाकरे यांनी आपल्या निवेदनातून व्यक्त केली आहे. विदर्भात व इतर जिल्ह्यात मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाच्या झळा तीव्र झाल्या आहेत. काही शाळांची पटसंख्या मोठी आहे. 25 एप्रिलनंतर उत्तरपत्रिका तपासणे, गुणतक्ते तयार करणे, संकलित व वार्षिक परीक्षा नोंदवही निकाल नोंदविणे, विद्यार्थीनिहाय स्वतंत्र गुणपत्रक तयार करणे यासाठी अतिशय कमी कालावधी मिळत आहे. या सर्व बाबी आणि उन्हाची तीव्रता याचा विचार करून शालेय व्यवस्थापनाला परीक्षांचे नियोजन करण्याचे अधिकार द्यावेत अशी प्रहार शिक्षक संघटनेची मागणी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# तीन लाखाचे मंगळसूत्र केले परत

## लस्सी व्यवसायिकाचा प्रामाणिकपणा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 ) –** पथ्रोट येथे लस्सीचे दुकान चालविणाऱ्या व्यावसायिकाने त्याच्या दुकानांमध्ये महिलेचे राहिलेले आजच्या भावात असलेल्या तीन लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र परत केले. त्याच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विनोद मेश्राम यांचे गावातील मुख्य रस्त्यावर लस्सी सेंटर आहे. त्या ठिकाणी मंगळवारी (ता.18) मार्चला दुपारी महिला पुरुष ग्राहकांची लस्सी घेण्यासाठी दुकानात गर्दी झाली होती. थोड्यावेळाने दुकानातील सर्व ग्राहक निघून गेल्यावर खुर्चीवर एक मोठी पिशवी त्यांना दिसून आली. त्या पिशवीत काय आहे याची तपासणी केली असता त्यामध्ये त्याला सुवर्णलंकाराचा डबा दिसून आला. तो त्याने उघडून पाहिला असता त्यामध्ये सोन्याचे एक मंगळसूत्र होते. त्याच्यासोबत वजन 31.350 ग्रॅम किंमत 1 लाख 54 हजार 399 रुपये किमत असल्याची अंजनगाव येथील एका सुवर्णकाराच्या दुकानाची 1 जानेवारी 2022ची पावती सुद्धा ठेवलेली होती. त्यावेळी घाबरलेल्या दुकानदाराने पावतीवरील फोन नंबरवर फोन लावून याची माहिती सुवर्णकाराला दिली. त्या आधारे महिलेचे मोबाईल नंबर मिळवून त्यांच्या स्वाधीन ते मंगळसूत्र करून दिले. आजच्या बाजारभावानुसार तीन लाख रुपये वरच्या किमतीचे हे मंगळसूत्र इमानदारीने परत करणाऱ्या विनोद मेश्राम या लस्सी सेंटर चालकाचे यावेळी प्रचंड कौतुक होत आहे.



# मोर्शीतील शेकडो वनीकरण मजुरांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 18 ) –** मोर्शी तालुक्यातील सामाजिक वनीकरण मजुरांनी गेल्या सहा महिन्यांपासून रखडलेल्या पगाराच्या मागणीसाठी सोमवारी (दि.17) अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. शेकडो मजुरांनी एकत्र येत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली आणि त्वरित थकबाकी पगार मिळावा, अशी मागणी केली. मजुरांनी सांगितले की, सहा महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. अनेकांना घरातील खर्च भागवणे कठीण झाले आहे. वीजबिल थकित राहिल्याने वीज वितरण कंपनीने वीज तोडण्याची नोटीस पाठवली आहे. अशा परिस्थितीत काम करूनही पगार न मिळणे अन्यायकारक असल्याचे मजुरांचे म्हणणे आहे. मजुरांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर दोन दिवसांत वेतन दिले गेले नाही, तर संपूर्ण मजूर वर्ग आमरण उपोषणाला बसेल. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कुठलीही सुचना न देता सोसायटी निवडणूक घेणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करा!

## जिल्हाधिकारी, सहकारी संस्था सहाय्यक निबंधकांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.18 )–** आसरा माता मस्त्य व्यवसाय सहकारी सोसायटी अडगाव बुद्रुक ( र. नं. 609) निवडणूक असल्याबद्दल व सभासदांना माहिती दिली नाही. तसेच निवडणूक कार्यक्रम प्रसिद्धी करताच घेण्याचे ठरले. याप्रकरणी निवडणूक घेणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी एका निवेदनातून करण्यात आली आहे.



सविस्तर वृत्त असे की, आसरा माता मस्त्य व्यवसाय या निवडणुकीमध्ये एकूण 39 सदस्य असुन त्यामधील पार्डी गावातील 12 सदस्य आहे निवडणूक विभागाकडून अध्यक्ष व सचिव यामध्ये ज्यांच्याकडे यादी आली. निवडणूक घेण्याचे प्रसिद्ध झाले त्यांनी इतर सदस्यांना न कळवता निवडणूक घेण्यात ठरवले त्यामुळे निवडणुकीवर इतर सदस्यांनी बहिष्कार टाकू आम्हाला ते निवडणूक पुन्हा सर्वांना माहिती करून घ्यावी तसेच कुठलीही पुर्वसुचना न देता निवडणूक घेणाऱ्यावर कार्यवाही करण्याची मागणी पार्डी येथील गाजानन मेश्राम, पंजाब मेश्राम, गजानन मेश्राम, साहेबराव मेश्राम, रामाजी मेश्राम, अमोल मेश्राम, नागोराव मेश्राम, उमेश देवगडे, गणेश मेश्राम, योगेश मानकर, राजेश मानकर, पार्डी येथील सरपंच अक्षय मेश्राम उपस्थित होते.

# खेड येथे संत शांतामाता पुण्यतिथी सोहळा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.18 ) –** मोर्शी तालुक्यातील खेड येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही आठवडी बाजार चौकात संत शांतामाता पुण्यतिथी सोहळा साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दहीहांडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात खेडसह परिसरातील गावांतून मोठ्या संख्येने भाविकभक्त सहभागी झाले होते. संत शांतामाता पुण्यतिथी उत्सव समितीच्या वतीने दरवर्षी या सोहळ्याचे आयोजन केले जाते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी करण्याकरिता अजय लोयटे, ईश्वर लोयटे, संदीप पारवे, श्रीकांत लोणारकर, नारायण भारस्कर, निरंजन सायवान, गंगाधर लोयटे, सत्यम गोंडेकर, धीरज लोयटे, मंगेश लोयटे, नितीन लोयटे, राहुल लोयटे, शैलेश लोणारकर, ऋषिकेश लोयटे, संजय सायवान, शेषराव पाटील, प्रमोद लोयटे, विकी ठाकरे, अक्षय बिजवे, आदित्य सायवान, रामदास लोयटे, सुनील गोंडेकर, अंकुश लोयटे, सागर लोयटे, आकाश लोयटे, धरम शनवारे, सुमेर चौधरी, राहुल फुलंबरकर, रोशन उइके, गणेश नानोरे, यश नानोरे, श्याम वाघाडे, योगेश नेवारे, वैभव कवरे, निलेश नेवारे, आशिष काळसर्प, प्रेम लोयटे, सुभाष येतुलकर, रितेश कांबळे, मंगेश नेमाडे, दिनेश नेमाडे, अतुल भारस्कर, विनोद सुरजुसे, गजानन सुरजुसे, विलास सुरजुसे आदींनी परिश्रम घेतले.



# 21 मार्चला अमरावतीत शेतमजूर हक्क एकता परिषद

## कॉ. गुलजार सिंग गोरिया करणार मार्गदर्शन ■ शेतमजुरांच्या मागण्यांचे ठराव मांडणार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.18 ) –** महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन संलग्न भारतीय खेत मजदूर युनियन, अमरावती जिल्हा कौन्सिलच्या वतीने शेतमजूर हक्क एकता परिषद शुक्रवार, 21 मार्च रोजी सकाळी 11 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन, भीम टेकडी, बेनोडा शाळेजवळ, यशोदा नगर चौक, अमरावती येथे आयाजित करण्यात आली आहे. आहे. या परिषदेला बीकेएमयूचे राष्ट्रीय सरचिटणीस कॉम्रेड गुलजारसिंग गोरिया हे उपस्थित राहणार आहेत.

परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन चे राज्य सरचिटणीस कॉ. शिवकुमार गणवीर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष कॉ. नामदेव चव्हाण राहतील. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. राम बाहेती, भाकपचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉ. तुकाराम भस्मे, राज्य सरचिटणीस कॉ. संजय मंडवधरे, लाल बावटा युनियनचे विजय बचाटे, हौंसलाल रहांगडाले, भाकपचे जिल्हा सचिव कॉ. सुनील मेटकर, आयटकचे जिल्हाध्यक्ष जे. एम. कोठारी, लक्ष्मणराव धाकडे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

शेतीमध्ये यांत्रिकीकरणाच्या वाढत्या वापरामुळे शेतमजुरांचा रोजगार अत्यल्प झाला आहे. शेतमजुर व महिलांना अल्प मजुरी मिळत आहे. ग्रामीण भागातील शेतमजुरांचे शहराकडे कामासाठी स्थलांतर होत आहे. अनेक ठिकाणी त्यांना वेठबिगारासारखी वागणूक मिळत आहे. उद्योगपतींना जमीन खरेदीसाठी मर्यादा ठेवली नाही. सिलिंग कायद्याची योग्य अंमलबजावणी झाली नाही. जमिनीची गेल्या कित्येक वर्षापासून पुनर्रचना झाली नाही.

त्यामुळे लाखो शेतमजूर हे अद्यापही भूमिहीन आहेत. दादासाहेब गायकवाड व कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात झालेल्या अभुतपुर्व जमीन सत्याग्रहानंतर महाराष्ट्रात कुळ कायदा सिलिंगचा कायदा व इतर शासकीय योजना राबवून भूमिहीनांना जमिनी मिळाल्या. मात्र गेल्या पन्नास वर्षात भूमिहीनांना जमिनी देण्यासाठी सरकारने कोणतीही पावले उचलली नाहीत. राज्यभरात लाखो भूमिहीन सरकारी पडित गायरान जमीन कसून उपजीविका करत आहेत. त्यांना आता सौर ऊर्जा प्रकल्प त्या ठिकाणी उभा करण्याच्या नावाखाली व इतर शासकीय प्रकल्प उभारण्याचा बहाणा करून त्या जमिनीवरून हाकलून लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासह अन्य विविध प्रश्नांवर या परिषदेत चर्चा करुन ठराव पारित करण्यात येणार आहे. शिक्षण, आरोग्य, जातीय विषमता, भ्रष्टाचार, रोजगार या विषयांवरही परिषदेत विचारमंथन होणार आहे. परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कॉ. चंद्रकांत वडस्कर (जिल्हाध्यक्ष), सुनील घटाळे (कार्याध्यक्ष) व इतर पदाधिकार्यांनी केले आहे.

# अंजनगाव बारी येथील विहिरीत आढळला अज्ञाताचा कुजलेला मृतदेह

## ■ दोन महिन्यांतील दुसरी घटना ■

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.18 )–** अंजनगाव बारीतील येथील शेख जमील शेख गफूर यांच्या शेतात असलेल्या विहिरीत अज्ञात मृतदेह आढळल्याची घटना (दि.17) सायंकाळी 6.15 वा. च्या सुमारास उघडकीस आली.

बडनेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अंजनगाव बारी येथे एका शेतातील विहिरीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह मिळाल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या मृतदेहाचे अद्याप ओळख पटली नाही. विहिरीत मिळालेला अज्ञात मृतदेह मिळाल्यामुळे हत्या की आत्महत्या हे सांगणे सध्या कठीण आहे. बडनेरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण हे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल होत. विहिरीतून मृतदेह काढण्याची प्रक्रिया केली. या मृतदेहाची याआधी अंजनगाव बारी परिसरातील दि.28 जानेवारी रोजी रेल्वे पुलाजवळील गोठाण परिसरात अशीच घटना घडली असुन अद्यापही मृतदेहाची ओळख पटली नसल्याचे समजते.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे सतीश बापूराव घडेकर आणि पल्लवी सतीश घडेकर यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन – मौजे पोही, शेकापुर (रत्नापूर) ग्रामपंच्यायत जूना मालमत्ता क्रं. 45, नवीन मालमत्ता क्रं. 41. ता. अंजनगाव सुर्जी जिल्हा. अमरावती.

चतुः सीमाः **पूर्व**– नारायण बापूराव घडेकर यांचे घर

**पश्चिम**– सरकारी रस्ता **उत्तर**– सुरेश घडेकर यांचे घर

**दक्षिण**– नरेंद्र घडेकर यांचे घर

सदर मिळकत नामे सतीश बापूराव घडेकर आणि पल्लवी सतीश घडेकर यांना ग्रामपंच्यायत पोही शेकापुर रत्नापूर यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे. तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय–नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745


# सालगड्यासाठी गावोगावी सुरु आहे शोधाशोध

## मजुरांच्या वाढलेल्या अपेक्षांमुळे शेतकरी हैराण

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.18 )–** गुढीपाडवा जवळ आला तरी सालगडी मिळत नसल्याने व त्यांचे पगार गगनाला भिडल्याने त्यातच आजची तरुण पिढी शेती व्यवसायापासून दूर राहत असल्याने आगामी काळात शेती व्यवसाय डोकेदुखी ठरणार असल्याचे चित्र राज्याच्या विविध ग्रामीण भागात दिसून येत आहे.

शेती मोठ्या प्रमाणात निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. गत काही वर्षापासून शेती करणे आव्हानात्मक झाले होते. पाऊस अत्यंत अल्प, नाहीतर बरसला की अति होत आहे. त्यात खरीप व रबी हंगामातील पीक काढणीला आले की अतिवृष्टीने नासाडी होत असल्याचे वास्तव आहे.

सालगडी म्हणून गुंतून राहण्यापेक्षा अनेक जण बांधकाम, वीटभट्टी, ऊसतोडणी, मंदिर बांधकाम, बार अँड रेस्टॉरंटमध्ये कामगार म्हणून जातात. येथे अधिक कमाई होत असल्याने ग्रामीण भागातील शेतमजूर शहराकडे वळाले आहेत. त्यामुळे सालगडी मिळणे सध्या शेतकऱ्यांसमोरील एक मोठे आव्हान ठरत आहे. सालगडी मिळत नसल्याने शेतकरी आपली शेती बटाईने देण्यावर भर देत आहेत. या वर्षात गुढीपाडवा जवळ आला तरी सालगडी मिळत नसल्याने शेतकऱ्यांपुढे दुहेरी संकट उभे ठाकले आहे. अनेक शेतकरी सालगड्याच्या शोधात भटकत आहेत.



### सालगड्याचे पॅकेज दिड लाखावर

शेतीतून मिळणारे उत्पन्न कमी आणि शेतीसाठी करावा लागणार खर्च अधिक, यामुळे शेतकरी दुहेरी अडचणीत सापडला आहे. यंदा सालगड्याचा पुर्ण वर्षाचा पगार एक लाख ते दीड लाखापर्यंत गेला आहे. बऱ्याच गावांमध्ये स्थानिक पातळीवर सालगडी मिळत नसल्याने इतर जिल्ह्यांतून सालगडी शोधून आणण्याचे काम शेतकऱ्यांना करावे लागत आहे.